# पनवेल नगर परिषद

( महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ कलम ४५ अन्वये )

~~सुधारित~~+ विस्तारित विकासाची परवानगी

प्रति, श्रीम. पार्वतीबाई शँकर कोळे व इतर पाच शिरत्यार. राधिका सदाशीव सुर्यराव रा: पनवेल

आर्की: सतीश मनोहर (वास्तुकल्प)

क्रमांक पनपा/बांप/प्र. ५८९ २१२१/१२/२००६
दिनांक: २८/८/०८

पवल - ४ २०१७ ८०३ २० / ८८

विकासाचे काम पार पाडण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ याच्या कलम ४५ अन्वये मिळण्यासाठी ~~प्लॉट क्र./सर्वेक्षण क्रमांक~~/नगर भूमापन क्रमांक/~~अ.भू.क्र.~~ ५९९ ५९९/३ ६०० ६०१ ६०९ मार्ग/~~रस्ता~~ मार्केट यार्ड येथे स्थित असलेल्या प्रभाग क्र. २४ गाव पनवेल येथे बांधकाम परवानगी करीता केलेल्या अर्ज क्रमांक १६८३ दिनांक २५.२.०८ च्या संदर्भात पुढील अटीच्या अधिन राहून बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

१) सदरहू बांधकाम परवानगी एक वर्ष पर्यंत वैध असेल.

२) परिशिष्ट 'अ' मधील सर्व अटी आपणांवर बंधनकारक राहतील.

३) या परवानगीमुळे जी जमिन तुमच्यामध्ये विहीत झालेली नाही, अशा जमिनीचा विकास करण्याचा हक्क असणार नाही.

४) सर्व बांधकाम/दुरूस्ती सोबतच्या मंजूर नकाशाप्रमाणे करणे / करावी. त्यामध्ये कोणत्याही तऱ्हेचा फेरबदल अगाऊ मंजूरी शिवाय करता कामा नये.

५) चयुतऱ्या पर्यंत बांधकाम करावे. चयुतऱ्याचे प्रमाणपत्र घेतल्यानंतरच पुढील कामास सुरूवात करावी.

६) इमारतीचा वापर बदल करायचा असल्यास त्याची परवानगी घेणे आवश्यक राहील.

७) भोगवटा प्रमाणपत्र घेतल्या वाचून इमारतीचा भोगवटा करू नये, केल्यास कायदेशिर कार्यवाही केली जाईल.

८) दि. २८.९.०६ परवानगीतील अटी बंधनकारक राहतील.

मंजूर बांधकाम परवानगी व्यतिरिक्त काम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ नुसार कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
पनवेल नगर परिषद

Scanned with CamScanner

पवल – ४
८६३ | २०१७
२९ / ८८

<u>पनवेल नगर परिषद</u>
<u>बांधकाम परवानगी</u>

परवानगी क्र.
दिनांक १८/०४/२०

<u>परिशिष्ट – अ</u>

अटी :

१) जागेच्या मालकी हक्काची, वहिवाटी व आजूबाजूचे मालमत्ता मालकीची हर एक प्रकारचे तक्रारीसंबंधी सर्व जबाबदारी अर्जदारावर राहील.

२) प्रस्तावित भूखंड बिनशेती परवानगी मिळालेला असावा, नसल्यास महसूल खात्याकडून बिनशेती परवानगी घेतल्यानंतर बांधकाम करणेस सुरुवात करावी.

३) बांधकाम करण्यापूर्वी भूखंडाचे / मालमत्ता ही तालुका निरीक्षक व भूमी अभिलेख यांच्याकडून सिमांकन करावे व त्यानंतर बांधकामास सुरुवात करावी.

४) सर्व बांधकाम / दुरुस्ती सोबतच्या मंजूर नकाशाप्रमाणे करावे / करावी.

५) बांधकाम करतांना शेजारी असलेल्या मालमत्ताधारकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) बांधकाम करण्यास पनवेल नगर परिषदेकडून कोणत्याही प्रकारची पाण्याची व्यवस्था होणार नाही.

७) सांडपाण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी.

८) नियोजित इमारतीच्या मालकीचे, विकासकाचे, वास्तुविशारद व ठेकेदार यांची संपूर्ण नावे व पत्ते, नियोजित इमारतीच्या जागेचा सर्व्हे नंबर / सिटी सर्व्हे नंबर/ मालमत्ता नगर / अं.भू.क्र.आणि प्रभाग क्र. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र/ निवासी व वाणिज्य गाळ्यांची संख्या व त्यांचे क्षेत्रफळ, तपशिलवार मंजूर नकाशाची प्रत ज्या ठिकांणी माहितीसाठी उपलब्ध असेल त्या ठिकाणचा पत्ता, सदरचा तपशिल ज्या ठिकांणी गृहबांधणी व वाणिज्य संकुल प्रस्तावित असेल त्या भागातील दोन वर्तमानपत्रात देण्यात यावा. त्यामधील एक स्थानिक भाषेमधील (मराठी) असावे.

९) इमारतीचे बांधकाम हे भूकंपरोधक स्वरुपाचे भारतीय मानक संस्थेने प्रमाणित केलेल्या तरतुदीप्रमाणे करण्यात यावे आय.एस. १८९३/१९८४, ४३२६/१९९३, १३८२७/१९९३, १३८२८/१९९३, १३९२०/१९९३, १३९३५/१९९३.

१०) नियोजित इमारतीवर काम करणाऱ्या कर्मचारी व मजूरांची यादी पत्ता व फोटोसह जवळच्या पोलीस स्टेशनला देणेत यावी.

क्र.मा.पहा..

Scanned with CamScanner

दस्त - ४
८०३ | २०१७
२२ / ४४

११) सदर इमारतीचे बांधकाम करतांना आरसी सी डिझाईन आर्किटेक्ट कडून स्ट्रक्चरल अभियंत्याकडून तपासणी करुन घेतल्यानंतर पुढील कामास सुरुवात करावी.

१२) नियोजित इमारतीचे बांधकाम करीत असतांना बांधकाम साहित्य नगर परिषदेच्या गटारात पडून ते तुंबणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच नियोजित इमारतीच्या समोरील नगर परिषदेच्या रस्त्यावर बांधकाम साहीत्य, डेब्रिज वगैरे पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३) सदरची परवानगी अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन देण्यात येत आहे.

१४) इमारतीवर काम करणाऱ्या मजूरांसाठी तात्पुरत्या शौचालयाची व्यवस्था करावी.

१५) केंद्रशासनाच्या परिपत्रकानुसार बांधकाम साहीत्यात फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश यावर आधारित साहीत्याचा वापर करणे बंधनकारक राहील.

१६) प्रस्तावित भूखंडात बांधकाम सुरु करण्यापूर्वी भूखंडात योग्य ठिकाणी बोअरवेल घेऊन त्या पाण्याचा वापर बांधकामाकरिता करण्यात यावा. त्यानंतर इमारत बांधकाम पूर्ण करतांना पाण्याच्या टाकीचे दोन भाग करुन एका भागात बोअरवेलचे पाणी साठवून त्याचा वापर बाथरुम / टॉयलेट करिता करण्यात यावा व दुसऱ्या भागात पिण्याचे पाणी साठवून पिण्याकरिता करण्यात यावा ही अट आपणावर बंधनकारक राहील. त्याशिवाय भोगवटा दाखला देण्यात येणार नाही.

१७) इमारतीमध्ये सार्वजनिक व वैयक्तिक सुविधांसाठी जेथे शक्य आहे तिथे जास्तीत जास्त सौर ऊर्जेचा वापर करण्यात यावा.

१८) भूखंडामध्ये अस्तित्वात विहीर असल्यास व नसल्यास त्या ठिकाणी बोअरवेल करुन त्याचे पाणी स्वच्छतागृहासाठी वापरावे व इमारतीमध्ये त्याची स्वतंत्र रचना करण्यात यावी.

१९) भूखंडामध्ये योग्य ते तंत्रज्ञान वापरुन रेन वॉटर हार्वेस्टींग करण्यात यावे व त्याबाबतचा आराखडा व तपशील परिषदेकडे सादर करावा.

मुख्याधिकारी
पनवेल नगर परिषद